## नियमित दिवाणी दावा क्र. ४५/२०१९

## नि.१९ खालील आदेश

१. वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ३९ नियम ७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. त्यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द कायम ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी माजगांव येथील सर्वे नं.१७१ (१६४) हिस्सा नं.१२ या मिळकतीवर उभा असलेला माजगांव ग्रामपंचायत इमला क्र. १६६१ हा दाव्याचा विषय असून प्रतिवादी यांनी नि.१५ कडे आपली कैफियत दाखल केलेली आहे. त्यांनी आपल्या कैफियतीमध्ये दावा इमला हा अस्तीत्वात नसलेबाबत कथन केलेले आहे. तसेच त्या ठिकाणी माजगांव ग्रामपंचायत क्र.४५५(अ) व ४५५(ब) असलेबाबत कथन केलेले आहे. त्यामुळे दावा विषयक मिळकतीमध्ये ग्रामपंचायत इमला क्र. १६६१ हा उभा आहे की माजगांव ग्रामपंचायत क्र.४५५(अ) व ४५५(ब) उभा आहे याबाबतची वस्तुस्थिती कोर्टासमोर येण्यासाठी ग्रामसेवक माजगांव यांची नेमणूक करुन त्यांचा अहवाल मागविण्यात यावा अशी विनंती वादीने केलेली आहे.

३. प्रतिवादीने नि.२० कडे आपले म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादीने सदरचा अर्ज वस्तुस्थिती मे. न्यायालयासमोर आणण्याकरीता दाखल केलेला आहे व वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे अत्यंत आवश्यक आहे. दावा विषयक मिळकत व दावा इमला क्र.१६६१ हा वेगळा इमला नसून इमला क्र. ४५५(अ) व ४५५(ब) हे दोन्ही एकत्रीत असलेले इमले याचा फायदा घेऊन वादी यांनी ग्रामपंचायतीची फसवणूक करुन चुकीची माहिती पुरवून, ग्रामपंचायतीतील लोकांना हाताशी धरुन असेसमेंट मिळविलेला आहे. इमला क्र. १६६१ हा अस्तीत्वातच नाही. त्यामुळे ग्रामसेवक माजगांव यांची नेमणूक करुन तसा अहवाल सादर करण्याबाबत आदेश करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रस्तुतचा अर्ज वादीने इमला क्र.४५५(अ) व ४५५(ब) दावा मिळकतीमध्ये अस्तीत्वात आहे किंवा कसे याबाबतची वस्तुस्थिती ग्रामसेवक माजगांव यांची

नेमणूक करुन त्याबाबतचा अहवाल अभिलेखावर आणणेबाबत विनंती केलेली आहे. प्रतिवादीने देखील वस्तुस्थिती अभिलेखावर येण्याकरीता आदेश करणेबाबत विनंती केलेली आहे. दावा इमला क्र.१६६१ व दावा इमला क्र. ४५५(अ) व ४५५(ब) हे दाव्यातील वाद विषय असून ते अस्तीत्वात आहेत किंवा कसे हे शाबीत करण्याची संपूर्ण जबाबदारी ही उभय पक्षकारांवर आहे. त्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ३९ नियम ७ प्रमाणे न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करता येणारी नाही. वादी व प्रतिवादी यांनी उपस्थित केलेले प्रश्न हे त्यांनी पुरावा दाखल करुन शाबीत करणे जरुरीचे आहे. वादीला वादातीत बाब शाबीत करण्याकरीता योग्य तो पुरावा अभिलेखावर दाखल करण्याचे पूर्ण स्वातंत्र आहे. असे असताना वादी न्यायालयीय आयुक्त यांची नेमणूक ही त्याच्या वतीने पुरावा गोळा करण्याकरीता मागत असल्याचे दिसून येते. तसेच पुरावा गोळा करण्याकरीता न्यायालयीन यंत्रणा पक्षकारांना वापरता येणारी नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज वादीच्या मागणीप्रमाणे मंजूर करता येणारा नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–:: आदेश ::–**

वादीचा नि.१९ कडील अर्ज नामंजूर करणेत येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)

KUMBHAR RANJANA GOVIND

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2024.04.06 17:59:48 +0530

दिनांकः– ०४/०४/२०२४

(श्रीमती आर.जी.कुंभार)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.